**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
**दुरध्वनी क्र.** : 0253-2461439 **ईमेल** : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
**विभागाचे नाव: नियोजन शाखा** **संकलन: कुंभमेळा**

---

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- नाशिक- त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन 2027-28 अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. अध्यक्ष जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 08 एप्रिल, 2025 रोजी दुपारी 04.00 वाजता, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे नाशिक- त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन 2027-28 अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त या सोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे. ही विनंती.

आपला विश्वासू,

**Signed by Yogendra Ashok Chaudhari**
**Date: 22-04-2025 09:22:36**

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक.

जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिकच्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक - ८ एप्रिल २०२५, वेळ दुपारी ०४:०० वाजता.
स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय , नाशिक.
बैठकीचे अध्यक्ष- डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक.

बैठकीच्या सुरुवातीला श्री. जलज शर्मा, सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी बैठकीच्या विषयांची पार्श्वभूमी विषद केली. सदर बैठकी दरम्यान विविध मुद्यांवर चर्चा झाली. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| अ | **सीसीटीव्ही** | |
| १ | सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची खरेदी करण्यासाठी त्यास शासनाची लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता घेऊन काम सुरू करावे. | NMSCDCL<br>नाशिक महानगरपालिका<br>नाशिक शहर पोलीस<br>नाशिक ग्रामीण पोलीस |
| ब | **जलशुध्दीकरण** | |
| १ | कुंभमेळा कालावधीत होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करता साधू, महंत, भाविक व नागरिकांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याचा पूरवठा करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने नाशिक - त्र्यंबकेश्वर येथील जलशुध्दीकरण केंद्रांची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजन करण्यात याव्यात. | नाशिक महानगरपालिका<br>नप त्र्यंबकेश्वर |
| क | **घाट व अनुषांगीक बाबी** | |
| १ | नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे आवश्यक असलेल्या अतिरिक्त घाटांच्या जागा निश्चित करून याबाबत पुढील बैठकीत सादरीकरण करण्यात यावे. | जलसंपदा विभाग<br>लघू पाटबंधारे विभाग |
| २ | त्र्यंबकेश्वर येथे अमृत स्नानाच्या वेळी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन तेथे तयार करावयाच्या बाह्य घाटांच्या ठिकाणी लोकांना चालण्यासाठी पथ (walkig trails), थांबण्यासाठीची व्यवस्था/ बसण्यासाठीची व्यवस्था, वाहनतळ, इ. बाबींचा समावेश करून आराखडा तयार करावा. त्याचप्रमाणे नाशिक येथे देखील अशाच पध्दतीने कामे करावीत. | नाशिक महानगरपालिका<br>जलसंपदा विभाग<br>लघू पाटबंधारे विभाग<br>नप त्र्यंबकेश्वर<br>नाशिक ग्रामीण पोलीस |
| ड | **विद्युत** | |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| १ | सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत घेण्यात आलेल्या मागील बैठकीत दिलेल्या निर्देशांनूसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. नाशिक या विभागाचे अधिकारी प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळयातील वीज वितरण प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी गेले होते. सदर अभ्यास दौऱ्याचे अनुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सादरीकरण केले. सदर सादरीकरणाच्या अनुषंगाने नाशिक, त्र्यंबकेश्वर व इतर महत्त्वाच्या ठिकाणी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यातील कामांची अंदाजपत्रके तत्काळ तयार करण्याच्या सूचना देऊन कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यासाठी सदरची अंदाजपत्रके वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात यावेत. | MSEDCL |
| २ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने कामांची अंदाजपत्रके तयार करताना नाशिक महानगरपालिकेशी समन्वय साधून utility specifications प्राप्त करून घ्यावेत. जेणेकरून CCTV प्रणालीसाठी लागणारी ऑप्टिकल फायबर केबल टाकणे सुलभ होईल. | MSEDCL<br>नाशिक महानगरपालिका |
| **इ** | **सर्वसाधारण सूचना** | |
| १ | सर्व विभागांनी नाशिक – त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्याच्या अनुषंगाने सादर केलेल्या आराखड्यांमध्ये वेळोवळी सुधारित होणार आहे/ सुधारणा होत आहे. यास अनुसरुन सर्व विभागांनी त्यांचे विभागाशी संबंधित कामांना जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समितीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार सर्व कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्यास कार्यारंभ आदेशापर्यंत (work order) आणून थांबवावे जेणेकरून आराखडयामध्ये वेळोवळी होणाऱ्या सुधारणांचा अंतर्भात त्यात करता येईल. | सर्व विभाग |
| २ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी सिंहस्थ कुंभमेळाअंतर्गत यापुढील होणाऱ्या सर्व बैठकांना उपस्थित रहावे. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. नाशिक |
| ३ | प्रयागराजच्या धर्तीवर गुणनियंत्रण प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरिन्सींगद्वारे प्रयागराज येथील संस्थेबरोबर बैठकीचे आयोजन करण्यात यावे. | E & Y |
| ४ | महानगरपालिकेत नव्याने रूजू झालेल्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती. नायर यांनी जिल्हा परिषद, नाशिक यांचे अधिकाऱ्यांसमवेत कोलकाता येथे डिजीटल कुंभ साठी अभ्यास दौरा करुन अहवाल सादर करावा. | नाशिक महानगरपालिका<br>जिल्हा परिषद, नाशिक |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| ५ | सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत सर्व विभागांना त्यांचे व इतर विभागाने अधिकारी/ कर्मचारी यांचेशी संपर्क साधण्यासाठी वापर करावयाच्या वायरलेस संच प्रणालीचे संख्यादर्शक सादरीकरण करण्यात यावे. | आपत्ती व्यवस्थापन विभाग |
| ६ | ब्रम्हगिरी परीक्रमेबाबत सर्वसमावेशक विकास आराखडा लवकरात लवकर सादर करावा. | वन विभाग (पश्चिम) |
| ७ | सिंहस्थ कुंभमेळा २०२७ दरम्यान नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या संभाव्य गर्दीच्या अनुषंगाने अग्निशमन सेवा व आपत्कालीन सेवांसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा विचार करुन सर्वसमावेशक योजना तयार करण्यात यावी व या बाबत अहवाल सादर करावा. | नाशिक महानगरपालिका<br>नप त्र्यंबकेश्वर<br>आपत्ती व्यवस्थापन विभाग<br>अग्निशमन विभाग |
| ८ | सिंहस्थ कुंभमेळा २०२७ अंतर्गत पार्किंगसाठी आवश्यक असलेली नाशिक रोड रेल्वे स्थानक येथील मालधक्क्याची जागा देण्यास रेल्वे प्रशासनाने सहमती दर्शविली आहे. परंतु, रेल्वे प्रशासनाने नविन मालधक्का उभारणीसाठी नाशिक रोड रेल्वे स्थानक लगत (adjoining railway tracks) शासनाच्या जागेची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने रेल्वे विभागाला आवश्यक असलेल्या नवीन जागेचा शोध घेण्यात यावा. जेणेकरून नविन जागा रेल्वे प्रशासनाला मालधक्का उभारणीसाठी उपलब्ध करून देता येईल. | जिल्हाधिकारी,नाशिक |
| ९ | सिंहस्थ कुंभमेळा २०२७ दरम्यान साधू महंतांना/ भाविकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय साहित्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली आराखडा अंतिम करावा. | जिल्हा शल्य चिकीत्सक<br>जिल्हा आरोग्य अधिकारी |
| | **बैठक** | |
| १ | सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७ च्या अनुषंगाने दि. ११ एप्रिल २०२५ रोजी दु.२.३० वा समिती कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात येईल. सदर बैठकीत खालील विषयांबाबत चर्चा करण्यात येईल.<br>१. बेजे, टाकेत व कावनई येथील तीर्थक्षेत्र विकास आराखडा बाबत सादरीकरण.<br>२. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सर्व मोठ्या रस्त्यांच्या प्रस्तावित कामांबाबत सादरीकरण. | नाशिक महानगरपालिका<br>जिल्हा परिषद नाशिक<br>सार्वजनिक बांधकाम विभाग<br>लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण<br>जलसंपदा विभाग<br>लघू पाटबंधारे विभाग<br>राज्य पुरातत्व विभाग<br>NMSCDCL<br>नाशिक शहर पोलीस |

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | ३. त्र्यंबकेश्वर येथील नदीपात्र व कूंड यांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत आराखड्याचे सादरीकरण.<br>४. सीसीटीव्ही च्या कामांबाबत सादरीकरण.<br>५. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील प्रस्तावित घाटांबाबत सादरीकरण. | नाशिक ग्रामीण पोलीस |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या, आणि त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 21-04-2025 17:28:18

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
तथा विभागीयआयुक्त, नाशिक.